# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग

## // प्रेसनोट //

दि.१४/१२/२०२३

सर्व नागरीकांना कळविण्यात येते की, मिरा-भाईंदर शहरास स्टेम प्राधिकरण व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एम.आय.डी.सी.) प्राधिकरणाकडून पाणी पुरवठा करण्यात येतो.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे (एम.आय.डी.सी.) पाणी पुरवठा योजनेच्या अंतर्गत बारवी जलशुद्धीकरण केंद्र जांभूळ येथे तातडीची दुरुस्ती कामे करणे करीता **शुक्रवार दि.१५/१२/२०२३ रोजी दुपारी १२.०० ते रात्री १२.०० वाजेपर्यंत (१२ तासाकरीता) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचा पाणी पुरवठा बंद राहणार आहे**. तसेच स्टेम प्राधिकरणाकडून होणारा पाणी पुरवठा सुरु राहणार आहे.

तरी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून होणारा पाणी पुरवठा पुर्ववत होईपर्यंत मिरा-भाईंदर शहरास पाणी पुरवठा कमी दाबाने व उशीराने होईल. नागरीकांनी पाण्याचा वापर काटकसरीने करावा व महानगरपालिकेस सहकार्य करावे.

(शरद नानेगांवकर)
**कार्यकारी अभियंता**
पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका